RNI No. MAHBIL/2009/31732
Reg. No. MH/MR/South-320/2010-12

महाराष्ट्र शासन राजपत्र

भाग चार-अ

वर्ष ३, अंक १७] गुरुवार ते बुधवार, ऑक्टोबर २७-नोव्हेंबर २, २०११/कार्तिक ५-११, शके १९३३ [पृष्ठे ३
[किंमत : रुपये ४.००]

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमान्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ ऑक्टोबर २०११

अधिसूचना

भारताचे संविधान.

क्रमांक सीडीआर. १०११/प्र.क्र. १०९/११.—भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाप्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहेत :—

१. या नियमांना महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, २०११ असे म्हणण्यात यावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ४ मधील पोट-नियम ५ मध्ये खंड (क) नंतर पुढीलप्रमाणे परंतुक समाविष्ट करण्यात येईल :—

"परंतु, जेथे शासकीय कर्मचा-यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असेल तेथे, या नियमान्वये देण्यात आलेल्या किंवा देण्यात आला असल्याचे मानलेल्या निलंबनाच्या आदेशात फेरबदल करण्यापुर्वी वा तो रद्द करण्यापुर्वी, असा आदेश ज्या प्राधिकरणाने दिला असेल किंवा ज्या प्राधिकरणाकडून देण्यात आला असल्याचे मानण्यात आले असेल ते प्राधिकरण किंवा असे प्राधिकरण ज्याच्या नियंत्रणाखाली असेल असे प्राधिकरण, शासनाने या प्रयोजनार्थ गठीत केलेल्या निलंबन आढावा समितीची शिफारस प्राप्त करून घेईल.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

पां. जो. जाधव,
शासनाचे उप सचिव.

क्रमांक सीडीआर.२०११/प्र.क्र. १०९/११,
सामान्य प्रशासन विभाग
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ११ ऑक्टोबर २०११.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,

मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,

मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,

सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,

*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,

*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,

*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,

*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

*आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,

सर्व मंत्रालयीन विभाग,

सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,

सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,

महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, विधानभवन, मुंबई (५ प्रती),

विधीमंडळ ग्रंथालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती),

निवड नस्ती

*पत्राने

पां. जो. जाधव,
शासनाचे उप सचिव.

GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 11th October 2011

NOTIFICATION

CONSTITUTION OF INDIA.

No. CDR.1011/C.R.109/11.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules further to amend the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 2011.

2. In rule 4 of the Maharashtra Civil Services (Discipline and Appeal) Rules, 1979, in sub-rule (5), after clause (*c*), the following proviso shall be added, namely :—

"Provided that, where a criminal offence is registered against a Government servant, the recommendation of the Suspension Review Committee constituted by the Government in this behalf, shall be obtained by the authority which has made or is deemed to have made the suspension order or by any authority to which that authority is subordinate, before revoking or modifying the order of suspension of such Government servant.".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

P. J. JADHAV,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.